# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या – ५०

### राज्यात ऑक्सीजन स्वलंबन योजना पूर्ण करण्याबाबत

**(१) ३२३०९ (१५-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावात ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेक नागरिकांना ऑक्सिजन अभावी जीव गमवावा लागला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑक्सिजन संदर्भामध्ये राज्य स्वयंपूर्ण करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने राज्यभरात ऑक्सीजन प्लांटची उभारणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,कोणकोणत्या ठिकाणी ऑक्सिजन प्लांटची उभारणी केली व त्यामधून राज्याला किती ऑक्सिजन मिळणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णयात्मक कार्यवाहीच्या अनुषंगाने मिशन ऑक्सिजन स्वावलंबन योजना पूर्ण करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ रुग्णालयात कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे नागरिकांचा मृत्यु झाल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सद्यस्थितीत राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा करण्याकरीता ५२३ PSA Plant कार्यान्वित आहेत. त्यामधून ५५२ मेट्रिक टन ऑक्सिजन उपलब्ध आहे.

(५) राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये १०% Type B व D सिलेंडरद्वारे, २०% PSA Plant द्वारे व उर्वरित ७०% LMO द्वारे ऑक्सिजन उपलब्धते बाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार उपाययोजना केलेल्या आहेत. सद्यस्थितीत राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा करण्याकरीता २०००० Type B ऑक्सिजन सिलेंडर, ५६५५१ Type D ऑक्सिजन सिलेंडर, ५२३ PSA Plant, १००० डुरा सिलेंडर, ३६४ लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँक कार्यान्वित आहेत. राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एका दिवसाकरीता कोविड कालावधीत ऑक्सिजनची मागणी १९१९ मेट्रिक टन होती. त्यानुसार एकूण ऑक्सिजन साठा क्षमता ६६०१ मेट्रिक टन आहे.

(६)प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड येथे जिल्हा शल्यचिकित्सकांची नियुक्त करण्याबाबत

**(२) ३२६०६ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे गेल्या दोन वर्षापासून जिल्हा शल्य चिकित्सकांचे कामकाज हे प्रभारी पध्दतीने चालत असल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील अनेक रुग्णालयातील अधिकाऱ्यांना काम करताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे कायमस्वरुपी जिल्हा शल्य चिकित्सक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०४-२०२३) :**(१) व (२) नांदेड येथील जिल्हा शल्यचिकीत्सकाचे रिक्त असलेले पद दि.०५/०८/२०२२ च्या शासन आदेशान्वये भरण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(३) ३५३३५ (१०-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरण मोहिम सुरु असून ही मोहिम राबविताना रिक्त पदांमुळे अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार लसीकरणाच्या मोहिमेस गती मिळण्यासाठी सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०३-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पदे रिक्त आहेत हे खरे आहे, मात्र जिल्ह्यातील दरमहा नियमित कृती आराखड्यानुसार लसीकरण सत्र घेऊन सर्व लाभार्थांचे लसीकरण करण्यात येते.

(३) सदर पदांची भरती प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**उल्हासनगर ३ (जि.ठाणे) येथील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ३६२०२ (१०-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर ३ (जि.ठाणे ) येथे जिल्हा मध्यवर्ती रुगणालयातील अनेक पदे रिक्त असून सदर पदे तातडीने भरण्यात यावीत अशी मागणी लोकप्रतिनिधी व सिव्हिल सर्जन,मध्यवर्ती हॉस्पिटल, यांनी शासनाकडे आणि संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे व जिल्हा चिकित्सक, ठाणे यांच्या कडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या दालनात झालेल्या दिनांक २८ जानेवारी,२०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत सुद्धा मागणी करण्यांत आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास हॉस्पिटल मधील वर्ग १ ची १० पदे आणि वैदकीय अधिकारी यांची पदे रिक्त असून सदर पदे तातडीने भरावीत अशी मागणी करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनात स्त्री रोगतज्ञ व भूलतज्ञ वैद्यकीय अधिकारी गट अ यांची पदे ही भरावीत अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०४-२०२३) :**(१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट -अ (एस -२३ व त्यावरील ) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ या संवर्गातील प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या शिफारशींमधून तसेच सन २०२३ या निवडसुची वर्षातील पदोन्नतीद्वारे उपलब्ध होणाऱ्या अधिका-यांमधून मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ येथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी यांच्या पदभरतीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यामधून वैद्यकीय अधिका-यांची पदे उपलब्ध करुन देण्यात येतील.

त्याच बरोबर आरोग्य यंत्रणेतील गट क संवर्गातील कनिष्ठ लिपीक संवर्गातील २६४ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत देण्यात आलेली आहे. तसेच गट-क संवर्गातील ९३५२ व गट-ड संवर्गातील ४९१५ ची नव्याने जाहिरात देण्यासाठी बिंदुनामावली प्रमाणीत करण्याची प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच सदर पदांची परिक्षा घेण्यासाठी कंपनी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून त्यामधून मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ येथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हा हिवताप कार्यालयाकडून बनावट अनुभव प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्या बाबत**

**(५) ४३१३६ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांची सन २००६ पासून भरती बंद असतानाही बीड जिल्ह्यात जिल्हा हिवताप कार्यालयातून बनावट अनुभव प्रमाणपत्र वाटप झाल्याचे विविध तक्रारीवरून व वर्तमानपत्रातून निदर्शनास आले असून या आधारे अनेकांनी शासकीय नोकरी मिळवली आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,तत्कालीन कर्मचारी व अधिकारी यांचा यात सहभाग असल्याने याबाबतची चौकशीही पूर्णपणे केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील उमेदवारांनी आर्थिक अनियमितात करून हे प्रमाणपत्र मिळवून नोकरी मिळविल्यामुळे गरीब ,होतकरू व पात्र उमेदवारांना संधी मिळत नसल्यामुळे रत्नागिरी हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आत्मदहनाचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत अनेक तक्रारी सतत केल्या गेल्या आहेत तसेच वर्तमानपत्रातही वारंवार वृत्त प्रकाशित झाले असल्याने यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार याबाबत जबाबदार बसण्या-या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बीड जिल्हा हिवताप कार्यालयाकडून बनावट अनुभव प्रमाणपत्र वाटप झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) प्राप्त अहवालानुसार हे खरे आहे.

(३) प्राप्त अहवालानुसार हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी विभागाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) जिल्हा हिवताप अधिकारी, बीड कार्यालयाच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. बीड येथील बनावट प्रमाणपत्र चौकशी अंती प्राप्त अहवालानुसार संबंधीत दोषी अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरूध्द दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे. तसेच बनावट अनुभव प्रमाणपत्र धारण केलेल्या उमेदवारांविरुध्द शिवाजी नगर पोलीस ठाणे, जि.बीड येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील ससून सर्वोपचार रुग्णालयात मृत्यूचा अंतिम अहवाल देताना गैरप्रकार होत असल्याबाबत**

**(६) ४४९६५ (११-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील ससून सर्वोपचार रुग्णालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभागात मृत्यूचा अंतिम अहवाल देताना गैरप्रकार होत असल्याचे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाचे शवागारातील वैद्यकीय अधिकारी मृत्यूचा अंतिम दाखला व त्यामध्ये फेरफार करून सोयीनुसार सुधारित दाखला देण्यासाठी रुग्णाचे नातेवाईक तसेच पोलिसांकडून पैशाची मागणी करत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी असण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१०-०४-२०२३) :**(१), (२) व (३) पोलिस उपआयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडून दि. २३.०५.२०२२ पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून, त्यांच्या अहवालात पोलिसांकडून पैशाची मागणी केली नसल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय रुग्णालयात होत असणाऱ्या डॉक्टरांच्या कमतरते बाबत**

**(७) ४५४२९ (११-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गामुळे आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखीत झाले असून सार्वजनिक आरोग्य विभागातील नियमित पदांपैकी १७,६६२ आणि कंत्राटी पदांपैकी १२,३०६ अशी २९,९६८ पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण व शहरी तसेच अतिदुर्गम भागातील रुग्णांना उपचारापासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ग्रामीण भागात लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन ३४४ प्राथमिक आरोग्य उप केंद्रे व ४७१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, तसेच २१० ग्रामीण रुग्णालये, शहरी भागात लोकसंख्येच्या तुलनेत नवीन ६२७ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ५८ मोठी रुग्णालये उभारण्याची आवश्यकता असल्याचे जन-आरोग्य अभियान अंतर्गत केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागात सर्व संवर्गनिहाय किती पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ (वर्ग-१) व सामान्य राज्यसेवा गट-अ मधिल रिक्त पदे पदोन्नती व सरळ सेवाव्दारे भरण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०४-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गात एकूण ५७५२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण ३८६९१ पदे भरण्यात आली आहेत व एकूण १८८३२ पदे रिक्त आहेत.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने एकूण ४१८९५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३११६४ पदे भरण्यात आलेली असून १०७३१ पदे रिक्त आहेत.

(२) होय, राज्यात वाढीव लोकसंख्या व अंतराच्या निकषाच्या आधारे आरोग्य संस्था निर्मितीचा अनुशेष शिल्लक आहे ही बाब खरी आहे.

(३) राज्यातील आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गातील मंजूर भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| म.वै.आ.से. गट-अ (वरीष्ठ संवर्ग) व सामान्य राज्य सेवा,गट-अ | १७८४ | १००८ | ७७६ |
| वैद्यकीय अधिकारी, गट-अ | ८४४१ | ६२९० | २१५१ |
| वैद्यकीय अधिकारी, गट-ब | १२८५ | १०४७ | २३८ |
| सामान्य राज्यसेवा, गट-ब | ९९० | २४७ | ७४३ |
| गट-क | ३१९११ | २१९०२ | १०००९ |
| गट-ड | १३११२ | ८१९७ | ४९१५ |
| एकूण | ५७५२३ | ३८६९१ | १८८३२ |

(४) सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील एकूण ३७२ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील एकूण १९५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तर महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट -अ (एस -२३ व त्यावरील ) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ तसेच सामान्य राज्य सेवा या संवर्गातील शिफारस प्राप्त उमेदवारांचा तपशिल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपलब्ध करुन दिला असून त्यानुसार शिफारस प्राप्त उमेदवारांना सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(८) ४५४३६ (११-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे याकरीता जास्तीत जास्त प्रसूती शासकीय संस्थांमध्ये व्हावे यासाठी विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी आरोग्य विभागाकडून केली जात असतानाही माहे एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधित १०,०३५ महिलांची प्रसूती घरी झाल्याचे दिनांक ५ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अतिरिक्त संचालक यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना समज दिली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या व बालकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :**(१) हे खरे आहे.

IHIP Portal( Integrated Health Information Platform) वर एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत १०६९७ महिलांची प्रसुती घरी झाल्याचे दिसून आले.

(२) याबाबत जिल्हयांना सुधारात्मक कार्यवाहीसाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

सर्वस्तरावर घरी प्रसूतीचे प्रमाण कमी करण्याच्या उपाययोजना करण्यात येत असून त्यामुळे माता व बाल आरोग्याकडे दुर्लक्ष झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयामध्ये आरोग्य विभागातील रिक्त पदांबाबत.

**(९) ४६८२८ (११-१०-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या दर्जेदार सुविधा मिळण्याकरीता गोंदिया जिल्हयामध्ये सुरू करण्यात आलेल्या ग्रामीण रूग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अधिकारी, कर्मचारी व तंत्रज्ञांची ३२७ पदे रिक्त असल्याने जिल्हयातील आरोग्य विभागावर याचा परिणाम होत असल्याचे माहे एप्रील, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे भरण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०४-२०२३) :**(१) हे अशंत: खरे आहे.

गोंदिया जिल्हयातील १० ग्रामीण रुग्णालये व ४० प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळुन गट-अ ते गट-ड मधील एकुण १२५६ मंजुर पदांपैकी ८८५ पदे भरलेली असुन ४०१ पदे रिक्त आहेत. सद्य:स्थितीत, कार्यरत मनुष्यबळा मार्फत तेथील रुग्णालयात नियमितपणे आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यात येत असुन रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३ व त्यावरील) मधील उपसंचालक, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ तसेच सामान्य राज्य सेवा गट-अ संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून एकूण ४४४ पदांच्या मागणीपत्राच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया अवलंबिल्यानंतर पुरेशे उमेदवार उपलब्ध न झाल्याने आयोगाकडुन केवळ २१७ उमेदवारांच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असुन त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात पदोन्नतीच्या कोट्यातील एकुण ३८२ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक, विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी संवर्गांतील सरळसेवेच्या कोट्यातील राज्यातील २१५१ रिक्त पदे भरण्याकरीता अद्ययावत बिंदूनामावली व आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर पदोन्नतीच्या कोट्यातील ४२२ रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने आयुक्तालयस्तरावर छाननी सुरु आहे. सद्य:स्थितीत, २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांपैकी ११४६ पदांवर बंधपत्रित व तदर्थ/ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सामान्य राज्य सेवा गट-ब मधील विविध संवर्गांतील एकूण ४४२ रिक्त पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या असुन निवड प्रक्रिया सुरु आहे. तर सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात एकूण १४८ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

आरोग्य यंत्रणेतील गट-क संवर्गांतील लिपिक संवर्गांतील २६४ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे. गट-क मधील उर्वरीत ९३५२ रिक्त पदांची व गट-ड संवर्गांतील ४९१५ रिक्त पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे. यामधून गोंदिया जिल्ह्यातील आवश्यक रिक्त पदे भरण्यात येतील.

(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**रावेर (जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याबाबत**

**(१०) ४७८९३ (०४-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) येथे शासनाने रुग्णालयासाठी नवीन प्रशस्त व सर्व सुविधायुक्त इमारत उभारली असून तेथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करावे अशी येथील जतनेची मागणी असल्याचे दिनांक१५ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रामीण रुग्णालयात एकच वैद्यकीय अधिकारी असून स्त्रारोग, बालरोग तज्ञ नाहीत, औषधांचा तुटवडा, असल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयात स्वखर्चाने उपचार करुन घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०४-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

(२) ग्रामिण रुग्णालय रावेर येथे वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१, वैद्यकीय अधिकारी गट-अ, दंतशल्य-चिकित्सक गट-ब, वर्ग -२ यांची एकूण ५ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर असून ती रिक्त आहेत. सदर ग्रामीण रुग्णालयात ग्रामीण रुग्णालय सावदा येथिल एक वैद्यकीय अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असून उपजिल्हा रुग्णालय मुक्ताईनगर येथिल एका वैद्यकीय अधिका-याकडे आहरण व संवितरण आधिका-याचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. औषधांचा साठा रुग्णसेवेच्या गरजेनुसार जिल्हास्तरावरुन पुरविण्यात येत आहे व सुरळितपणे रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.

(३) ग्रामीण रुग्णालय, रावेर, जि.जळगाव चे ३० खाटांवरुन १००खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करणे बाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. तसेच, वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१, वैद्यकीय अधिकारी गट-अ, दंतशल्य चिकीत्सक गट-ब, वर्ग-२ अशी वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील एकात्मिक बालविकास प्रकल्पातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(११) ४७८९८ (०४-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प या कार्यालयात गेली १५ वर्षे कायमस्वरुपी प्रकल्प अधकारी नसून इतर अधिका-यांना अतिरिक्त पदभार देऊन कार्यालयाचे कामकाज करण्यात येत असल्याचे दिनांक ४ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, येथे ३ अंगणवाडी सेविका, २० मदतनीस, ५ पर्यवेक्षिका ही पदे रिक्त असल्याने याचा परिणाम कामकाजावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२१-०४-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

महिला व बाल विकास विभाग, जि.प.जळगाव अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, मुक्ताईनगर येथील बाल विकास प्रकल्प अधिकारी, गट-ब ( राजपत्रित ) हे पद सन २०१३ पासून रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार लगतच्या बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याकडे तसेच, प्रकल्पातील सेवाजेष्ठ पर्यवेक्षिका यांच्याकडे वेळोवेळी देण्यात आलेला आहे.

वि.स. १६० (8)

(२) रिक्त पर्यवेक्षिका पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रकल्पातील कार्यरत पर्यवेक्षिका व लगतच्या प्रकल्पातील पर्यवेक्षिका यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच, रिक्त अंगणवाडी सेविका पदाचा कार्यभार जवळील अंगणवाडी केंद्रातील कार्यरत सेविकांकडे सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे कामकाजावर परिणाम झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३), (४) व (५) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**वृधत्व व मानसिक आरोग्य आजार केंद्र, अंबाजोगाई, जि. बीड येथे नवीन पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) विभाग मंजूर करणेबाबत**

**(१२) ४८३४८ (०९-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ३९ वैद्यकिय पथके कार्यरत असून त्यांच्यामार्फत शाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा व अंगणवाडीतील बालकांची वर्षातून दोन वेळेस आरोग्य तपासणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडीतील कमी वजनाच्या/तीव्र कुपोषित (SAM) बालकांना जिल्हा रुग्णालयातील पोषण पुनर्वसन केंद्रात (NRC) ॲडमिट करुन त्यांचे वजन वाढण्यासाठी योग्य तो सकस आहार व औषधोपचार दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हयात एकच पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) विभाग मंजुर असून तो जिल्हा रुग्णालय, बीड. येथे कार्यान्वित असल्यामुळे परळी, अंबाजोगाई, केज, या भागातील कमी वजनाच्या/तीव्र कुपोषित (SAM) बालकांना पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) विभागत ॲडमिट करुन घेण्यासाठी लांबचे अंतर असल्याने बालकावर मध्येच थांबून उपचार घेणे सर्वसामान्य पालकांसाठी आर्थिकदृष्टया अडचणीचे होत आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वृधत्व व मानसिक आरोग्य आजार केंद्र, अंबाजोगाई या ठिकाणी नवीन पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) विभाग मंजूर करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

बीड मध्ये सध्या एक पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) मंजूर आहे मात्र सॅम बालकास पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल करणे व १४ दिवसांच्या उपचारानंतर त्यास घरी परत सोडण्यासाठी जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) अंतर्गत बालकास व मातेस (सोबत असल्यास आशा) वाहतुकीची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येते. तसेच बालकांच्या माता/काळजीवाहक यांना रक्कम रू ३०० /- प्रति दिन प्रमाणे बुडीत मंजुरी व २ वेळचा आहार देण्यात येतो. त्यामुळे पालकांना आर्थिक अडचणीचे होत आहे हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदरचे रूग्णालय हे पहिल्या टप्प्यातील १०० खाटांचे राज्यातील पहिले वृधत्व व मानसिक आरोग्य केंद्र आहे व त्या ठिकाणी वृध्द व्यक्तींना आंतररूग्ण व बाहयरूग्ण सेवा देण्यात येत आहेत. सदर रूग्णालयात बालरोगतज्ञ नसल्यामुळे नविन पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) सुरू करता येणार नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १६० (9)

**अर्धापूर व मालेगाव (जि. नांदेड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१३) ४९३९७ (११-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि. नांदेड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय वर्ग-१, वैद्यकिय अधिकारी गट-३ यासह चार पदे व कुशल १६ पदा पैकी १५ पदे रिक्त तसेच मालेगाव ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक गट अ, सहाय्यक अधिक्षक वर्ग-३, औषध निर्माण अधिकारी व कनिष्ठ लिपीक असे एकूण चार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महत्वाची व आवश्यक उक्त पदे रिक्त ठेवण्याचे कारण काय आहेत,

(३) असल्यास, या भागातील नागरिकांची आरोग्य सेवेसंदर्भात होणारी गैरसोय टाळण्यासाठी सदरील सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०४-२०२३) :**(१) हे खरे नाही,

नांदेड जिल्यातील अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकाचे पद, वैद्यकीय अधिका-यांची ३ पदे, सहा.अधिक्षकाचे पद, अधिपरीचारीकांची ३ पदे, औषध निर्माण अधिका-यांचे पद, अशी १० पैकी ९ पदे भरलेली आहेत. तर वर्ग ४ ची रिक्त पदे ही बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

मालेगाव ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकचे पद, वैद्यकीय अधिका-यांची ३ पदे, अधिपरीचारीकांची ३ पदे अशी १० पैकी ७ पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) (३) वर्ग ३ मधील कनिष्ठ लिपीक संवर्गातील २६४ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत देण्यात आलेली आहे. तसेच गट-क संवर्गातील ९३५२ व गट-ड संवर्गातील ४९१५ ची नव्याने जाहिरात देण्यासाठी बिंदुनामावली प्रमाणीत करण्याची प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच सदर पदांची परिक्षा घेण्यासाठी कंपनी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामधुन आवश्यक पदे वरिल दोन्ही ग्रामीण रुग्णालयासाठी उपलब्ध करण्यात येईल. वरील दोन्ही रुग्णालयामध्ये नागरीकांची आरोग्य सेवे संदर्भात गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे येथील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१४) ४९५०१ (२१-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे येथे वैद्यकीय अधिकारी व वर्ग चार कर्मचाऱ्यांची शेकडो पदे रिक्त असल्याने रुग्णांना आरोग्यसेवा देणे कठीण होत असल्याने कार्यरत असलेल्या कर्मचार्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच,येथे सफाई कर्मचाऱ्यांची ८१ पदे मंजूर असून त्याबाबत सुमारे सहा वेळेस जाहिरात प्रसिद्ध होऊनही सफाई कामगारांचे एकही पद भरण्यात आले नसल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर पदे ८१ असून प्रत्यक्षात फक्त ५१ सफाई कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे येथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०३-२०२३) :** (१) भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गात १० पदे मंजूर असून सद्यस्थितीत ४ पदे तात्पुरत्या स्वरुपात भरलेली आहेत. तसेच वर्ग-४ संवर्गात मंजूर २२७ पदांपैकी १११ पदे भरलेली आहेत.

(२) व (३) सफाईगार संवर्गातील ८० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५१ पदे भरलेली आहेत. उर्वरीत पदे संस्थेने बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याचे प्रस्तावित होते. तद्नंतर सामान्य प्रशासन विभागाने दि.०४.०५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीबाबत दिलेले निर्देश विचारात घेऊन नियमित पदभरतीबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०४.०५.२०२२ च्या शासन निर्णयानुसार वर्ग-४ ची पदे ही जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत भरण्यात येणार असून त्यानुसार ११६ पदांचे मागणीपत्र संस्थेने जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे सादर केले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(१५) ४९५४६ (२१-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये आय.सी.यू. (ICU) तसेच एन.आय.सी.यू. विभागात खाटा अभावी रुग्णांना उपचारासाठी इतर रुग्णालयामध्ये दाखल करावे लागत असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णांना सीटी स्कॅन, एम.आर.आय. या सेवा तातडीने उपलब्ध होत नसल्याने आजाराचे निदान लवकर न झाल्याने रुग्णांचा वेळ वाया जाऊन त्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, येथे हृदयाचे विविध प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी भुलीचे डॉक्टर, ऑक्सिजन बाहेरून मागवावे लागत असल्याचे कारण सांगून पैश्याची मागणी करीत असल्याच्या तक्रारी रुग्णांनी केल्या असल्याने रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी वरिष्ठ डॉक्टरांची त्रिस्तरीय चौकशी समिती गठित केली आहे , हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ससून रुग्णालयातील आयसीयू तसेच एन.आय.सी.यू. व व्हेन्टीलेटर खाटां तसेच सीटी स्कॅन, एमआरआय या मशीनरींची संख्या वाढविण्यासह इतर उच्च तपासण्या जलद गतीने होणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०३-२०२३) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४). हे अशंत: खरे आहे. याबाबत रुग्णांकडून कोणतेही तक्रार प्राप्त नाही. तथापि, दैनिक लोकमतमध्ये दि. १२.१०.२०२२ रोजीच्या प्रकाशित झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने वरिष्ठ डॉक्टरांची त्रिस्तरीय समिती गठीत केली होती. या समितिच्या चौकशी अहवालात सदर वृत्तात कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही. तसेच, आय.सी.यू. व एन.आय.सी.यू. मध्ये आवश्यक व्हेंटीलेटर खाटा व सी.टी. स्कॅन, एम.आर.आय. मशीन उपलब्ध आहेत

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील सर जे.जे रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ४९६१८ (२१-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे रुग्णालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत, सदर पदे कंत्राटी पध्दतीने न भरता सरळ सेवेने

भरण्यात यावीत, गट "ड" कर्मचा-यांची प्रलंबित असलेली पदोन्नती करण्यात यावी तसेच वारसा हक्काची पदे भरण्यात यावीत अशा अनेक मागण्या संचालक, वैद्यकिय शिक्षण यांच्यासमावेत झालेल्या बैठकीत कर्मचारी संघटनाकडून करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास,विलंबाचह कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२३-०३-२०२३) :** (१) राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांच्या विविध मागण्यांसदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०८.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(२) संघटनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने संचालनालयामार्फत कार्यवाही सुरु असून त्याबाबत सदर बैठकीत संघटनेस अवगत करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-ड ची पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०४.०५.२०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सरळसेवेने भरण्यात येणार असून त्याबाबत सर्व अधिष्ठाता यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य बालहक्क आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांची रिक्त पदे तातडीने भरून त्यांच्या मानधनात वाढ होणेबाबत**

**(१७) ४९६७५ (२०-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य बाल हक्क आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांची पदे कधीही रिक्त राहणार नाहीत तसेच अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ संपून ती पदे रिक्त होण्याआधीच नव्या नियुक्तीची प्रक्रिया राबवावी असा आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक १५ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास दिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन वाढवण्याच्या आदेशाचे पालन न झाल्याने न्यायालय अवमान प्रकरणी नोटीस बजावलेल्या संबंधीत दोषी विरुद्ध शासनाने तात्काळ कारवाई करुन मानधनात त्वरीत वाढ करावी असे आदेशित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार गेली पाच वर्षे पासून रिक्त असलेली बालहक्क आयोगावरील पदे तात्काळ भरण्याच्या दृष्टीने तसेच अध्यक्ष व सदस्य यांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०५-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.
मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २८, २९ एप्रिल आणि २ मे, २०१६ च्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर नवीन अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी कमीतकमी ९ महिने आधी सुरू करावी जेणेकरून अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल पूर्ण होणे व नविन आयोगाचे गठन यामध्ये काळाचे अंतर राहणार नाही, असे निर्देश दिले होते.
(२) अंशतः खरे आहे.
मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २८, २९ एप्रिल आणि २ मे, २०१६ च्या आदेशान्वये आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन वाढविण्याच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय एका महिन्यात घेण्याबाबत निर्देश दिले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २२ जुलै, २०१६ च्या आदेशान्वये आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन वाढविण्याचा निर्णय विहीत कालावधीत न झाल्याने तत्कालीन सचिव, महिला व बालविकास विभाग यांना अवमान नोटीस बजावण्यात आली होती.

(३) शासनाच्या दि. २०/०५/२०१७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच त्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर दि. २९/०४/२०२२ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या दि.१/०८/२०१६ च्या शासन निर्णयान्वये आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील शहरी भागांमध्ये अतिरिक्त अंगणवाडी सुरु करणेबाबत**

**(१८) ५००३४ (२०-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहरी भागांमध्ये महिलांची आणि बालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने सध्या कार्यरत असलेल्या अंगणवाडीवर अधिक भार पडत असल्याने शहरी भागात प्रशासनाने २५० अंगणवाडी सुरु करण्याचा प्रस्ताव एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाकडे माहे सप्टेंबर,२०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी यासाठी आयुक्त,एकात्मिक बालविकास योजना तसेच ठाणे नागरी जिल्हा प्रकल्प समन्वयक अधिकारी यांचेकडे दिनांक १२ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हयातील शहरी भागात अंगणवाडींची संख्या वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२६-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे व मान्यतेने योजना राबविण्यात येते. अंगणवाडी केंद्राच्या संख्येमध्ये वाढ करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून राज्यात नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर झाल्यास पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि. रायगड) येथील जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१९) ५०११० (१८-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि. रायगड) येथील जिल्हा रुग्णालयातील ९ वैद्यकीय अधिकारी गैरहजर राहिल्याने जिल्हा आरोग्य यंत्रणा विस्कळीत होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी सतत गैरहजर राहत असल्याने जिल्हानिहाय नागरिकांना मुंबईतील रुग्णालयांत उपचारारासाठी जावे लागत आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबाग जिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरुन रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,
जिल्हा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०/२३) संवर्गातील एकूण ५० वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ८ वैद्यकीय अधिकारी गैरहजर आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे,
जिल्हा रूग्णालय, अलिबाग येथे उपलब्ध विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांच्या कडून उपचारार्थ आलेल्या रूग्णांना आवश्यक त्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. तथापि, अतिगंभीर रूग्णांसाठी ज्या सुविधा जिल्हा रूग्णालय, अलिबाग येथे उपलब्ध नाहीत अशा रूग्णांना पुढील उपचारार्थ मुंबई येथे संदर्भीत करण्यात येते.
(३) वैदयकीय अधिकारी, गट अ (एस-२३) ची रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
तसेच वैदयकीय अधिकारी (एस-२०) ची रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे. आरोग्य सेवा सुरळीत ठेवण्याकरीता वैद्यकीय अधिकारी (एस-२०) ची रिक्त पदे बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (११ महिने कालावधीकरीता) या पद्धतीने देखील भरली जातात.
सामान्य राज्यसेवा गट-ब मधील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. प्रशासकीय अधिकारी गट-ब यांची पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
गट-क व ड संवर्गाची सरळसेवेच्या वाट्यावरील रिक्त पदे भरण्यासाठी नव्याने रोस्टर प्रमाणित करुन घेणे आणि परिक्षा घेणा-या एजन्सीची निवडीची कार्यवाही सुरु आहे. रिक्त पदांवर अतिरिक्त कार्यभार तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी तत्वावर नियुक्त्या देऊन नियमीत रूग्णसेवा देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "माता सुरक्षित तर घर सुरक्षित" अभियानाची अंमलबजावणी करणेबाबत

**(२०) ५०५९३ (१८-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आरोग्य विभागामार्फत "माता सुरक्षित तर घर सुरक्षित" हे अभियान माहे सप्टेंबर-आक्टोंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आले असून यात केलेल्या सर्वेक्षणात ग्रामीण भागातील महिलांमध्ये अतितणाव, मधुमेह ,उच्च रक्त दाब, कॅन्सर, ह्रदय विकार, तोंडाचा कर्करोग आणि शरीरातील कमी रक्ताचे प्रमाण या समस्या प्रामुख्याने निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, शहरी व ग्रामीण भागातही या अभियंतर्गत तपासणीचे अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्ह्यात या अभियानाअंतर्गत एकुण ११ लक्ष महिला लाभार्थ्यांपैकी केवळ २ लक्ष महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली असल्याने उर्वरीत लाभार्थी महिलांची आरोग्य तपासणी न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, महिलांच्या आरोग्याचे प्रश्न व त्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत शासनाने कोणते धोरण ठरविले वा ठरविण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बीड जिल्ह्यात या अभियानांतर्गत एकूण १०,०१,५२१ महिला लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे.

(४) राज्यातील १८ वर्ष वयावरील सर्व महिलांची मोफत तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये आढळून आलेल्या विविध प्रकारच्या आजारासाठी शासकीय आरोग्य संस्थास्तरावर मोफत संदर्भ सेवा व उपचार उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात "लेसिक" या शस्त्रक्रियेसाठी लागणारी ब्लेड रुग्णालयात पूरेश्या प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत

**(२१) ५०६०१ (२१-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात डोळयांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही उपयुक्त तसेच चष्म्याचा नंबर घालविण्यासाठी केल्या जाणाऱ्या "लेसिक" ही डोळयांची शस्त्रक्रीया केवळ ब्लेड उपलब्ध नसल्यामुळे पुढे ढकलण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, खाजगी रुग्णालयात सदर शस्त्रक्रिया या जवळपास ५० ते ७० हजार रुपयात होत असून सर जे.जे. रुग्णालयात या शस्त्रक्रिया फक्त १० हजारात रुपयात होत असल्याने परिणामी अनेक गरीब रुग्ण यापासून वंचित राहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे ब्लेड वेळेत उपलब्ध करण्यात दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषीवर कारवाई करणेसह लेसिक या शस्त्रक्रीयेसाठी लागणारी ब्लेड रुग्णालयात पूरेश्या प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२०-०३-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, बीड अंतर्गत करार तत्वावर पदे भरण्यासंदर्भात

**(२२) ५०८३६ (२१-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, बीड अंतर्गत करार तत्वावर ८९ पदे भरण्यासाठी दिनांक ३ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास जाहिरात प्रसिद्धी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, प्राप्त झालेल्या अर्जा पैकी १२५६ पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्धी करण्यात आली असून ८९ पदावर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पात्र यादीतील उमेदवारांपैकी काही उमेदवारांना निवड करण्यासाठी आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे आरोग्य विभागाने शहर पोलिस स्टेशन, बीड येथे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
एकूण ८७ पदांची जाहिरात देण्यात आली होती.
(२) हे अंशत: खरे आहे.
मुलाखती अंती एकूण ५१ उमेदवारांना पदनियुक्तीचा आदेश निर्गमित केलेले आहे.
(३) हे खरे नाही.
उमेदवारांची निवड करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार झालेला नाही.परंतु दैनिक आमचा अभिमान या स्थानिक वर्तमानात दि.२३.०८.२०२२ रोजीच्या बातमीनुसार कुठल्याही प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार होऊ नये व उमेदवारांची फसवणूक होऊ नये याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत शहर पोलिस स्टेशन बीड येथे लेखी तक्रार देण्यात आलेली आहे.
(४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार देवून कायदेशीर कार्यवाही करण्याचे जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी पोलीसांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाथर्डी व राहुरी व नगर (जि.अहमदनगर ) तालुक्यातील प्रलंबीत असलेले नविन प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रस्ताव

**(२३) ५०८७१ (१८-०१-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील ब्राम्हणी (ता. राहुरी ) आडगांव तसेच वैजु बाभुळगांव (ता.पाथर्डी) , आलमगीर (ता.नगर) या ठिकाणी नविन प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु करण्यास मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव माहे ऑक्टोबर , २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषद , अहमदनगर, यांच्याव्दारे सहसंचालक ,आरोग्यसेवा,आरोग्य भवन , मुंबई यांना सादर केलेले आहेत,हे खरे आहे काय,
(२)असल्यास , प्रस्ताव सादर करुन प्रदीर्घ कालावधी होऊनही अद्याप शासनाने सदर प्रस्तावास मान्यता दिलेली नाही , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोव्हीड-१९ च्या प्रार्दुभावामुळे राज्यातील आरोग्य सेवेच्या मर्यादा तसेच साथरोग नियंत्रणासाठी आवश्यक असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु करण्याबाबत विचार होऊन उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०४-२०२३) :**(१) व (२) हे अशंत: खरे आहे.
याबाबतचे जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाचा दि. ०५.०१.२०१५ चा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयास प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. सदर प्रस्ताव दि. ०२.१२.२०२२ रोजी तारांकित प्रश्नाच्या उत्तरासोबत प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये ब्राम्हणी ता. राहुरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व आलमगीर, ता. नगर, आडगाव ता. पाथर्डी, वैजुबाभुळगाव या ठिकाणी उपकेंद्र मंजुर करण्याबाबतचे प्रस्तावित केले आहे. तथापि, यासोबत मंजुरीसाठी शासनास सादर करण्याकरिता आवश्यक असलेली कोणतीही कागदपत्रे जोडलेली नसल्याने उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित परिपुर्ण प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह पाठविण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना कळविले आहे.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्याच्या सूचना सर्व जिल्हयांना देण्यात आले आहे. त्यानुसार मार्गदर्शक सूचना व निकष तयार करुन राज्यातील सर्व उपसंचालक परिमंडळे व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्गमित केले. त्यानुसार जिल्हयांचा एकत्रित नवीन आरोग्य संस्था स्थापन करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुसार उपसंचालक नाशिक मंडळ नाशिक यांचे दि. ११.१२.२०१९ पत्रान्वये अहमदनगर जिल्हयाचा जोडबृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असुन यामध्ये २४ प्राथमिक आरोग्य केंद्र व ११८ उपकेंद्रे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. तथापि यामध्ये उपरोक्त प्रस्तावामधील सदर नांवे प्रस्तावित केली नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चिखली (ता. धारूर जि.बीड) येथे जलजिवन मिशन योजने अंतर्गत नियम व अटीचे पालन होत नसल्याबाबत

**(२४) ५१३८८ (२१-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चिखली (ता. धारूर जि.बीड) येथे जलजिवन मिशन योजने अंतर्गत नियम व अटीचे पालन न करता जुन्याच विहिरीचे खोदकाम पूर्ण करून मोजमाप पुस्तिका तयार करून देयके अदा केल्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक१६ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :**(१) अशा आशयाचे निवेदन केले आहे, हे खरे आहे.
(२) सदर योजनेची कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, बीड यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर ठिकाणी जुनी विहीर नसून जल जीवन मिशनच्या निकषांप्रमाणे नवीन विहीर घेण्यात आलेली असल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडीचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ५१३९६ (२०-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंगणवाडी मंजूर करण्याची प्रक्रिया ही केंद्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत होत असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने केंद्र शासनास पाठवण्यात आलेले ८१७० अंगणवाडीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी शहरांमध्ये जवळपास २०० अंगणवाडी केंद्रांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावांना मान्यता मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२६-०४-२०२३) :** (१), (२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे व मान्यतेने योजना राबविण्यात येते. अंगणवाडी केंद्राच्या संख्येमध्ये वाढ करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे.

भिवंडी-निजामपूर महानगरपालिका क्षेत्रात २ प्रकल्प कार्यरत असून त्यापैकी भिवंडी या प्रकल्पात एकूण ४६ अतिरीक्त अंगणवाडी केंद्र व भिवंडी-निजामपूर या प्रकल्पात एकूण ४८ अतिरीक्त अंगणवाडी केंद्र असे एकूण ९४ अतिरीक्त अंगणवाडी केंद्रांची सद्यस्थितीत आवश्यकता असल्याबाबत संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी मागणी केली आहे.

राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून राज्यात नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर झाल्यास पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुर्गम आदिवासी भागात नवजात बालकांचे मृत्यू टाळण्याकरीता वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२६) ५१४६८ (२१-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार आणि धाडगाव (जि.नंदुरबार ) तालुक्यामध्ये गर्भवती महिलांसाठी विशेष शासकीय रुग्णालये आहेत परंतू तेथे तज्ञ वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांवर उपचार होत नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यात मागील पाच वर्षात केवळ वैद्यकीय सुविधांच्या अभावामुळे सुमारे एक हजार बालकांचा गर्भावस्थेत मृत्यू झाला असून सुमारे दोन हजार बालकंचा जन्मानंतर काही कालावधीतच मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुर्गम आदिवासी भागात नवजात बालकांचे मृत्यू टाळण्याकरीता काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना अधिक सुविधा देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुर्गम आदिवासी भागात नवजात बालकांचे मृत्यू टाळण्याकरीता तज्ञ वैद्यकीय सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही,

नंदुरबार आणि धाडगाव तालुक्यामध्ये ४ बालरोग तज्ञ, ४ स्त्री रोग तज्ञ व १ भुलतज्ञ उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

नंदुरबार जिल्हयात १ जिल्हा रुग्णालय, २ उप जिल्हा रुग्णालय, ११ ग्रामीण रुग्णालय, ६१ प्राथमिक आरोग्य केंद्र, २०३ सी.एच.ओ., २९० उपकेंद्रे फिरते पथक या आरोग्य सुविधाद्वारे माता व बालकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते. या संदर्भ सेवेसाठी सर्व संस्थेत रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे नंदुरबार येथे वैद्यकीय सेवेसाठी नविन वैद्यकीय महाविद्यालय सुरु झालेले आहे. त्यामुळे वैद्यकीय सेवे अभावी मृत्यू झाले असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे माता व बाल मृत्यू टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) दुर्गम भागात काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना हार्डशीप भत्ता देण्यात येतो.

(४) दुर्गम भागात तज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी मेळघाटात चक्राकार पध्दतीने तज्ञ उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याचप्रमाणे e-sanjivani Tele-Consultation द्वारे तज्ञ सेवा CHO स्तरावर देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील अंगणवाडी इमारत बांधण्यास होत असलेला विलंब**

**(२७) ५२०४३ (२०-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा सांख्यिकी अहवालानुसार जिल्ह्यामधील सर्व अंगणवाड्याच्या इमारत बांधकाम मंजूर असतानाही जवळपास पंधराशेच्या वर अंगणवाड्यांना स्वमालकीची स्वतंत्र इमारत नसल्याने अंगणवाड्यांचा कारभार भाड्याच्या खोलीमध्ये किंवा उघड्यावर चालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, जिल्ह्यातील १११ अंगणवाड्याच्या इमारतीचे बांधकाम निधी अभावी प्रतिक्षेत असल्याची बाब माहे ऑक्टोंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमा (एम.एस.डी.पी.) अंतर्गत या अंगणवाड्याना निधी मंजुर करण्यात आलेला आहे परंतू मंजुर निधीचे पत्र विभागाकडेच पडून असल्यामुळे निधी अभावी अंगणवाडीची कामे पूर्ण होऊ शकली नाही , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडी इमारत बांधकाम न होण्याची कारणे काय आहेत व किती दिवसांमध्ये इमारत बांधकाम पुर्ण करण्यात येणार आहेत तसेच यास विलंब होण्यास जबाबदार असण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२६-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (एम.एस.डी. पी.) सदर १११ अंगणवाड्यांसाठी निधी मंजूर झालेला नाही.
(४) व (५) सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १०६ नवीन अंगणवाडीच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच महिला व बाल विकास करिता जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३% निधीमधून ११ कामे प्रस्तावित आहेत. अंगणवाडी बांधकाम माहे मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याची कालमर्यादा असून त्यानुसार माहे मार्च २०२४ पर्यंत कामे पुर्ण करण्यात येणार आहेत.

---

**मौजे सोनेसांगवी. (ता. केज. जि. बीड.) .क्र.१ साठी प्रकाशित करण्यात आलेल्या निविदेमध्ये दुरुस्ती करून सोनेसांगवी.क्र. २, चा समावेश करण्याबाबत**

**(२८) ५२०८६ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोनेसांगवी. (ता. केज. जि. बीड.) क्र. १,या गावाची जलजीवन मिशन कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत निवड करण्यात आली असून सदर गावासाठी पाणीपुरवठ्याच्या कामाचे अंदाजपत्रक ही तयार करण्यात आले आहे व निविदाही प्रकाशित करण्यात आलेली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये सोनेसांगवी.क्र. २, गावासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसून. दोन्ही गावची एकत्र ग्रामपंचायत असल्याने या दोन्ही गावासाठी नळयोजना होणे आवश्यक आहे परंतू सोनेसांगवी.क्र. २, या

गावासाठी तरतूद केल्याचे दिसून येत नसल्यामुळे सोनेसांगवी.क्र. १, साठी प्रकाशित करण्यात आलेल्या निविदेमध्ये दुरुस्ती करून सोनेसांगवी.क्र. २, चा समावेश अंदाजपत्रकामध्ये करून निविदा प्रकाशित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री व मुख्यकार्यकारीअधिकारी, जिल्हा परिषद बीड. यांच्याकडे दिनांक २२/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शाासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त सोनेसांगवी.क्र.१ साठी प्रकाशित करण्यात आलेल्या निविदेमध्ये दुरुस्ती करून सोनेसांगवी.क्र. २, चा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे सोनेसांगवी क्र. १ चा समावेश असलेले निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली होती. जिल्हा परिषद स्तरावरुन केलेल्या चौकशी दरम्यान आढळून आलेल्या तथ्याप्रमाणे सोनेसांगवी क्र. २ चा समावेश करुन सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सुचना प्रकल्प व्यवस्थापन संस्था Wapcos लि. यांना देण्यात आलेल्या आहेत. सुधारीत योजना मंजुर करून सोनेसांगवी क्र. २ ला पाणी पुरवठा सुविधा देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांत तज्ज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय अधिकारी आणि इतर अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने रुग्णांची होणारी गैरसोय

**(२९) ५२१३४ (२१-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तज्ज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय अधिकारी आणि इतर अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होत असल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तिनही जिल्ह्यांतील सर्वाधिक रिक्त पदांची संख्ये १९५ इतकी असून
यामध्ये ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक ८६ रिक्त पदे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०४-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे,

ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत रुग्णालयात उपचारार्थ आलेल्या रुग्णांना आवश्यक त्या आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असुन, सदर रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) ठाणे मंडळातील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील एकुण ४१ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश दि.०१.०८.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वरील संवर्गा तील सरळसेवेच्या कोट्यातील शिफारस प्राप्त उमेदवारांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु असुन त्यामधून महसूल वाटप धोरणानुसार ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील राज्यातील २१५१ रिक्त पदे भरण्याकरीता अद्ययावत बिंदूनामावली व आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर पदोन्नतीच्या कोट्यातील ४२२ रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने आयुक्तालयस्तरावर छाननी सुरु आहे. सद्य:स्थितीत, २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांपैकी ११४६ पदांवर बंधपत्रित व तदर्थ/ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सामान्य राज्य सेवा गट-ब मधील विविध संवर्गातील एकूण ४४२ रिक्त पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या असुन निवड प्रक्रिया सुरु आहे. तर सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात एकूण १४८ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

आरोग्य यंत्रणेतील गट-क संवर्गातील लिपिक संवर्गातील २६४ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे. गट-क उर्वरीत ९३५२ रिक्त पदांची व गट-ड संवर्गातील ४९१५ रिक्त पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.

वरील निवड प्रक्रियेतुन ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील आवश्यक रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरी (जि.नांदेड) तालुका येथील केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशनच्या योजनेच्या उद्घाटनास अधिकारी उपस्थित नसल्याबाबत

**(३०) ५२३१७ (२१-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) तालुका येथील केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना जलजीवन मिशनच्या कामाचे उद्घाटन करते वेळी जिल्हा परिषद / पंचायत समितीचे तालुका प्रमुख म्हणून गटविकास अधिकारी कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असताना सदर कार्यक्रमास उपस्थित राहिले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुदळा या ठिकाणी उद्घाटन प्रसंगी नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही व जे मिळते ते शुद्ध नाही अशी तक्रार केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी (नायगाव) दूरध्वनीद्वारे चौकशी केली असता उद्घाटन उत्तर दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत गटविकास अधिकारी यांची उच्च स्तरीय सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

संबंधित गट विकास अधिकारी हे दिपावली सुट्टीनिमित्त किनवट तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ परिसरातील त्यांचे मूळ गावी असल्याने दिनांक २२.१०.२०२२ रोजी भ्रमणध्वनीद्वारे मा. लोकप्रतिनिधी महोदयांशी योग्य तो संपर्क होऊ शकला नाही असे त्यांनी त्यांच्या खुलाश्यात नमूद केले आहे. तथापि, त्याच दिवशी त्यांनी मा. लोकप्रतिनिधी महोदयांच्या नांदेड येथील निवासस्थानी भेट घेवून आवश्यक ती माहिती त्यांना दिलेली आहे, असेही त्यांनी सदर खुलाश्यात नमूद केले आहे.

(३) याबाबत गट विकास अधिकारी यांची बदली करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नांदेड यांनी सादर केला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात तात्काळ सेवेतील रुग्णवाहिकांची संख्या वाढविण्याबाबत**

**(३१) ५२३२२ (२१-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात प्राथमिक, ग्रामीण व जिल्हा रुग्णालयांमध्ये १०८ क्रमांकाच्या तात्काळ सेवेतील रुग्णवाहिकांची संख्या अत्यंत कमी असल्याने वेळेवर रुग्णवाहिका रुग्णापर्यंत पोहचत नाही तसेच १०२ क्रमांकांची रुग्णवाहिका ही गरोदर मातांसाठी असून त्यांची सेवाही रुग्णांना तात्काळ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तात्काळ सेवेतील दोन्ही रुग्णवाहिकांची संख्या वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तात्काळ सेवेतील रुग्णवाहिकांची संख्या ग्रामीण भागात वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (३१-०३-२०२३) :** (१) नाही

(२) होय

(३) महाराष्ट्र शासनामार्फत सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षात १००० रुग्णवाहिका खरेदी केल्या आहेत. त्या सद्यस्थितीत आरोग्य संस्थामार्फत कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उदभ्वत नाही.

---

**राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयांतील रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत.**

**(३२) ५२३८७ (२१-०१-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयांत डॉक्टरांसह वैदयकिय अधिकारी आणि इतर अनेक महत्वाची पदे रिक्त असल्याने आरोग्य व्यवस्थांची दुरावस्था झाल्याची बाब माहे सप्टेंबर-२०२२ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदामूळे शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्वसमान्य रुग्णांनाची गैरसोय होत असून त्यांना खाजगी रुग्णालयात स्वखर्चाने उपचार घ्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आरोग्य यंत्रणेतील रिक्त पदांचा आढावा घेऊन तसेच याबाबत निर्णय घेऊन सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०४-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२३ व त्यावरील) मधील एकूण १७८४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १००८ पदे भरलेली असून ७७६ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२०) वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ८४४१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६२९० पदे भरलेली असून २१५१ पदे रिक्त आहेत.

तथापि, रुग्णालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येत असुन, रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३ व त्यावरील) मधील उपसंचालक, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ तसेच सामान्य राज्य सेवा गट-अ संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून एकूण ४४४ पदांच्या मागणीपत्राच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया अवलंबिल्यानंतर पुरेशे उमेदवार उपलब्ध न झाल्याने आयोगाकडुन केवळ २१७ उमेदवारांच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असुन त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात पदोन्नतीच्या कोट्यातील एकुण ३८२ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक, विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील राज्यातील २१५१ रिक्त पदे भरण्याकरीता अद्ययावत बिंदूनामावली व आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर पदोन्नतीच्या कोट्यातील ४२२ रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने आयुक्तालयस्तरावर छाननी सुरु आहे. सद्य:स्थितीत, २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांपैकी ११४६ पदांवर बंधपत्रित व तदर्थ/ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सामान्य राज्य सेवा गट-ब मधील विविध संवर्गातील एकूण ४४२ रिक्त पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या असुन निवड प्रक्रिया सुरु आहे. तर सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात एकूण १४८ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

आरोग्य यंत्रणेतील गट-क संवर्गातील लिपिक संवर्गातील २६४ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे. गट-क मधील उर्वरीत ९३५२ रिक्त पदांची व गट-ड संवर्गातील ४९१५ रिक्त पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई , जि . बीड, येथील 'थेलेसिमिया' रुग्णांना उपचार व सुविधा मिळणे बाबत.**

**(३३) ५२७१८ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि. बीड. येथे 'थेलेसिमिया' या आजाराच्या रुग्णांना लागणारी उपचार सुविधा तसेच उपचारासंबधी लागणारे ब्लड, औषधी, गोळया या सुविधा मिळत नसल्यामुळे येथे उपचार घेणाऱ्या रुग्णासाठी एकूण ६ प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ०९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त रुग्णालयात थेलेसिमिया रुग्णांना लागणारी उपचार सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०९-०५-२०२३) :**(१) होय.

(२) स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये एकूण ८५ थॅलेसेमिया आजाराचे रुग्ण उपचार घेत असून, त्यापैकी ५७ रुग्ण १२ वर्षाखालील असून त्यांचा उपचार बालरोग विभागातील स्वतंत्र कक्षात केला जातो व उर्वरित २८ रुग्ण १२ वर्षावरील असून त्यांचे उपचार रुग्णालयातील औषधवैद्यकशास्त्र विभागात केले जाते. बालरोग विभागात उपचार घेणा-या रुग्णांसाठी स्वतंत्र खोली देण्यात आलेली आहे.

रुग्णालयातील बालरोग विभागात उपचार घेणा-या थॅलेसेमिया रुग्णांसाठी एक वरिष्ठ निवासी डॉक्टर व एक सहाय्यक प्राध्यापक यांची नियुक्ती करण्यात आलेली असून, दर बुधवारी रुग्णांची तपासणी त्यांच्याद्वारे केली जाते.

सद्य:स्थितीत थॅलेसेमिया रुग्णांना हाफकिन महामंडळाकडून प्राप्त डेफेरासिरॉक्स (Deferasirox) गोळया देण्यांत येतात.

रुग्णालयातील बालरोग विभागात उपचार घेणा-या थॅलेसेमिया रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे लाभ देण्यांत येऊन १ दिवसांत रुग्णांना सुट्टी देण्यांत येते. परंतु, ज्या रुग्णांच्या भरतीच्या वेळी रक्ताचे (Haemoglobin) प्रमाण बरेच कमी असते, अशा रुग्णांना उपचारासाठी ०२ दोन वेळा ब्लड ट्रान्सफ्युजनची आवश्यकता असल्यामुळे त्यांना ०२ दिवसांत सुट्टी देण्यात येते.

रुग्णालयातील बालविभागात थॅलेसेमिया रुग्णांची भरती झाल्यानंतर रुग्णांचे रक्त तात्काळ क्रॉस मॅचिंगसाठी ब्लड बॅकेत पाठविण्यांत येते व २४ तासात आंतरुग्णांना सुट्टी देण्यांत येते. तसेच, अतिआवश्यक थॅलेसेमिया रुग्णांकरिता सकाळच्या सत्रातही रक्तपुरवठा केला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १८ वर्षावरील अनाथ मुला-मुलींसाठी शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये १ टक्का आरक्षण ठेवण्याबाबत**

**(३४) ५२७२८ (२०-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या अनाथ मुलांसाठी म्हाडा,सिडकोसह अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये १ टक्का आरक्षण ठेवण्याची मागणी तसेंच कार्पोरेट कंपन्या वा दानशूर व्यक्तीही याबाबत पुढाकार घ्यावा अशी मागणी राज्यातील अनाथ मुलांच्या संघटना तसेंच राज्य शासनाच्या अनाथ सल्लागार समिती सदस्यांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,म्हाडा सिडकोसह अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये अनाथ मुलांसाठी १ टक्का आरक्षण ठेवून सवलतीच्या दरात घरे उपलब्ध करुन देण्याबाबत तत्कालीन राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ मे, २०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०४-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

राज्यातील अनाथ बालकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत दिनांक १२ मे, २०२२ रोजी तत्कालीन मा. राज्यमंत्री (म.व बा.वि) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या विषयसूची मध्ये म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेमध्ये अपंगाच्या धर्तीवर अनाथ मुलांना १ टक्का आरक्षण ठेवण्याबाबतचा विषय समाविष्ट होता. तथापि, सदर बैठकीचे इतिवृत्त अंतिम होऊ शकले नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) ५२७३६ (२१-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर आणि वैद्यकीय कर्माच्याऱ्यांची पदे रिक्त असल्याने सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मच्याऱ्यांचे १२ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०३-२०२३) :** (१) व(२)

ग्रामीण रुग्णालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती येथे एकुण २८ पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदे भरलेली व १४ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रूग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक (एस-२३) | ०१ | ०० | ०१ |
| २ | वैद्यकीय अधिकारी (एस-२०) | ०३ | ०१ | ०२ |
| ३ | सहा. अधिक्षक, वर्ग-३ | ०१ | ०१ | ०० |
| ४ | कनिष्ठ लिपिक | ०२ | ०१ | ०१ |
| ५ | क्ष-किरण वै.अधिकारी, वर्ग-३ | ०१ | ०० | ०१ |
| ६ | प्रयोगशाळा वैज्ञा. अधिकारी, वर्ग-३ | ०१ | ०० | ०१ |
| ७ | अधिपरिचारीका वर्ग-३ | ०७ | ०५ | ०२ |
| ८ | औषध निर्माण अधिकारी, वर्ग-३ | ०२ | ०१ | ०१ |
| ९ | प्रयोगशाळा सहायक, वर्ग-३ | ०१ | ०१ | ०० |
| १० | दंत आरेखक, वर्ग-३ | ०१ | ०० | ०१ |
| ११ | वाहनचालक, वर्ग-३ | ०१ | ०० | ०१ |
| १२ | शिपाई, वर्ग-४ | ०१ | ०० | ०१ |
| १३ | कक्षसेवक, वर्ग-४ | ०४ | ०३ | ०१ |
| १४ | सफाईगार, वर्ग-४ | ०२ | ०१ | ०१ |
| | एकूण | २८ | १४ | १४ |

सद्यस्थितीत रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक (एस-२३) चे ०१ पद मंजूर असून सदर पदावर प्रभारी वैद्यकीय अधिक्षक कार्यरत आहेत. तसेच वैदयकीय अधिकारी (एस-२०) ची ०३ पदे मंजूर असून त्यापैकी ०१ नियमितपणे भरलेले आहे व ०२ पदांवर प्रतिनियुक्तीने वैदयकीय अधिकारी कार्यरत आहेत. सामान्य रुग्णालय, अमरावती येथील क्ष-किरणतज्ज्ञ यांच्या सेवा सदर ग्रामीण रुग्णालयात वर्ग करण्यात आलेल्या आहेत व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रुग्णसेवेत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झालेली नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी, गट अ (एस-२३) ची रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैदयकीय अधिकारी (एस-२०) ची रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच गट- क व ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत देखील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

### अमरावती येथील प्री-फॅब रुग्णालय विनावापर असल्याबाबत

**(३६) ५३७४६ (२१-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :**सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे कोरोनाची संभाव्य तिसरी लाट गृहीत धरुन उभारण्यात आलेल्या साडेतीन कोटी खर्चाचे १०० खाटांचे प्री फॅब रुग्णालय अपुऱ्या मनुष्यबळाने मागील एक वर्षापासून विनावापर असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या रुग्णालय परिसरात दुर्गंधी पसरली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर रुग्णालयाला मनुष्यबळ उपलब्ध करुन देऊन ते तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०४-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सद्यस्थितीत कोविड रुग्ण नसल्यामुळे सदर प्री-फॅब रुग्णालयामध्ये कंत्राटी मनुष्यबळाची मागणी करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्हयातील आरोग्य विभागातील परिचारिकांच्या सेवा समाप्तीचा आदेश दिल्याबाबत

**(३७) ५४१६३ (२१-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरच्या आरोग्य विभागात गत १४ वर्षांपासूनसेवा देणा-या ३९ परिचारिकांच्या सेवा समाप्तीचा आदेश आरोग्य अभियानाचे सहसंचालक यांनी दिला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेश मागे घ्यावी अशी मागणी परिचारिकांनी जिल्हा परिषदेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू परिचारिकांचे सेवा समाप्ती आदेश देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू आदेश तातडीने मागे घेऊन परिचारिकांना दिलासा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये केंद्र शासनाने बिगर आदिवासी क्षेत्रातील ५९७ कंत्राटी आरोग्य सेविका यांच्या पदांना मंजुरी न दिल्याने त्यांच्या सेवा समाप्तीचे आदेश देण्यात आलेले होते.

(४) आयुक्त,आरोग्य सेवा,मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २०.०१.२०२३ च्या पत्रान्वये ५९७ एएनएम पदांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली असल्याने ५९७ एएनएम पदावरील व्यक्तींच्या सेवा पुर्ववत करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी आधिकारी,जिल्हापरिषद यांना कळविले आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील माहेर घर इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत.**

**(३८) ५४१८८ (२१-०१-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्ग भागात रस्ते अभावी अथवा अन्यकारणामुळे आरोग्यसेवा गावपाड्यात पोहोचत नसल्यामुळे गर्भवती प्रसूत महिला आणि नवजात बालकांना वेळेवर उपचारा अभावी होणारे मृत्यू टाळण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत माहेरघर योजना सन २०१३ -१४ मध्ये सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील १३ माहेर घरापैकी आठ माहेरघर इमारतीची दुरवस्था झाल्याने केवळ पाच माहेरघर सुस्थितीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पालघर, नंदुरबार, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, नाशिक, यवतमाळ आणि नांदेड अशा आदिवासी जिल्ह्यांमध्ये ही योजना सर्वात आधी सुरू करण्यात येऊन प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१६ मध्ये इमारतीचे बांधकाम करण्यात येऊनही या माहेरघरांची इतक्या लवकर दुरवस्था होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे कायआहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :**(१) हे खरे आहे. मात्र माहेर घर योजना सन २०१०-११ पासून कार्यरत आहे.

(२) १३ माहेरघरांपैकी सात माहेर घरे सुस्थितीत असुन सहा माहेर घरांच्या दुरुस्ती व देखभालीची आवश्यकता आहे.

(३) राज्यात सद्यस्थितीत ९० माहेरघरे आहेत. सन २०१०-११ मध्ये ५८ माहेरघरे बांधण्यात आली असुन सन २०१६-१७ मध्ये गडचिरोली जिल्हयात २३ व पालघर जिल्हयात ९ अशी एकुण ३२ माहेरघरे बांधण्यात आली आहेत. त्यापैकी पालघर जिल्हयातील ६ माहेरघरांची अतिवृष्टी, देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक तरतुद नसणे, तसेच कोवीड कालावधीत वापर न होणे इत्यादी कारणामुळे दुरावस्था झालेली आहे.

(४) निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील उप जिल्हा रुग्णालयात कायमस्वरुपी प्रसुतितज्ञ, भूलतज्ञ नियुक्त करण्याबाबत**

**(३९) ५४२६८ (२१-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील उप जिल्हा रुग्णालयात कायमस्वरुपी प्रसूतितज्ञ, भूलतज्ञ नसल्यामुळे नांदगांव गावातील महिला प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाली असता तिच्या बाळाचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिथे उपस्थित असलेल्या परिचारिका आणि इतर डॉक्टर यांचे दुर्लक्ष हे ही त्यासाठी कारण ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर घटनेतील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेसह येथे कायमस्वरुपी प्रसुतितज्ञ, भूलतज्ञ नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०३-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे. नांदगांव गावातील महिला दि.०७.१०.२०२२ रोजी प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाली असता तिच्या बाळाचा मृत्यू झाला हे खरे आहे. तथापि, उपजिल्हा रुग्णालय, भोर येथे स्त्रीरोगतज्ञ व भुलतज्ञ ही नियमित पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) व (३) हे खरे आहे. सदर घटनेशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर ग्रामीण रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्ग, औषधसाठा आणि अद्ययावत साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत

**(४०) ५४२८८ (२१-०१-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर ग्रामीण रुग्णालयात अपुरा औषधसाठा, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच अद्ययावत साधन सामुग्री उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास,सदरहू ग्रामीण रुग्णालयात विहित वेळेत वैद्यकीय उपचार आणि रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने एका होतकरू तरुणाचा हृदयविकाराचा झटक्याने मृत्यू झाला असल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राजापूर ग्रामीण रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्ग, औषधसाठा आणि अद्ययावत साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) श्री. श्रीकांत शिवाजी खानविलकर या रुग्णास दिनांक २७.१०.२०२२ रोजी सकाळी ६.२० ते ६.३० च्या दरम्यान ग्रामीण रुग्णालय, राजापूर येथे दाखल करण्यात आले. प्रथम दर्शनी सदर रुग्ण दारूच्या अमलाखाली होता. सदर रुग्णाचा ECG देखील काढण्यात आला होता. तथापि उपचारादरम्यान रुग्ण अत्यावस्थ झाल्याने, रुग्णाचे नातेवाईक यांनी त्यांना १०२/१०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध होण्यास विलंब होत असल्याने, खाजगी वाहनाने खाजगी रुग्णालयात घेऊन गेले. तथापि, खाजगी रुग्णालयात रुग्णास भरती करून घेण्यात आले नाही. त्यामुळे रुग्णास राजापूर ग्रामीण रुग्णालयात नातेवाईकांनी परत आणले व तपासणी अंती रुग्णास मृत घोषित करण्यात आले. राजापुर ग्रामीण रुग्णालयात रुग्णाचे शवविच्छेदन करण्यात आले. सदर रुग्णाचे शवविच्छेदन केल्यानंतर व्हीसेरा केमीकल ॲनालायसीससाठी पाठविण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निमगाव (ता. मलकापूर,जि.बुलढाणा) येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान पी आय पी अंतर्गत इमारत व निवासस्थान बांधकाम करणेबाबत

**(४१) ५४३२१ (२१-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

(१) निमगाव (ता. मलकापूर,जि.बुलढाणा) येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान पी आय पी २०२२-२३ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत व निवासस्थान बांधकाम करणे प्राधान्याने मंजुरी देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राची व निवासस्थानाचे बांधकाम करण्यास मंजुरी देणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर कामाचा समावेश २०२२-२३ च्या पी आय पी मध्ये करुन केंद्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आला होता. परंतु सन २०२२-२३ च्या मंजुर पी आय पी मध्ये सदर कामाला मंजुरी मिळाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या आरोग्य आयुक्तांनी कर्मचाऱ्यांच्या सर्व समस्या सोडविण्याबाबत

**(४२) ५४४२४ (२१-०१-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आरोग्य आयुक्तांनी आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या शिस्तीबाबत परिपत्रक काढून सुटीच्या दिवशीही विना परवानगी मुख्यालय सोडू नका असे आदेश दिले असल्याची बाब माहे आक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागात अनेक वर्षांपासून रिक्त पदे असतानाही उक्त कर्मचारी ८ तासांपेक्षा जास्त सेवा देत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मानधन देय असताना त्यांच्या नैसर्गिक हक्कावर गदा आणत असल्याने सर्व कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसराला असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, आयुक्त पदाचा कार्यभार आयुक्तांनी घेतल्यावर राज्यभरातील सर्व गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र ते मोठया रुग्णालयातील सद्यःस्थितीचा आढावा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आढाव्यानुसार राज्यातील जनतेचे आरोग्य सुधारताना आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
आयुक्तालयामार्फत दिनांक ०७/१०/२०२२ रोजी कार्यालयीन शिस्तीबाबत परिपत्रक काढण्यात आले होते, हे खरे आहे. तथापि सदर परिपत्रकामध्ये पूर्व परवानगी घेतल्याशिवाय सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही मुख्यालय सोडू नये , अशा सूचना विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख व इतर अधिकारी यांना देण्यात आल्या होत्या.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) आरोग्य कर्मचा-यांच्या समस्यांविषयी वेळोवेळी दखल घेऊन उपाययोजना करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरणेबाबत

**(४३) ५४४६५ (२०-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकास, आरोग्य,आहार,कुपोषण तसेत मुलांना पुर्व प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून शासनाने एकात्मिक बाल विकास सेवा अंतर्गत अंगणवाडीची सुरुवात केली असुन ग्रामीण भागात पालकांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे,महिलांना आहार व आरोग्य ह्या विषयी योग्य मार्गदर्शन करण्याचे काम अंगणवाडी सेविका करत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात गत तीन वर्षापासून सेविका-१६४,मिनी सेविका-१६, मदतनीस-४०१ अशा एकुण ५८१ जागा रिक्त असल्याचे माहे, जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,आगामी काळात अंगणवाडी सेविकांच्या जागा भरल्या नाही तर बालकांच्या कुपोषणाची समस्या वाढण्याची शक्यता असल्यामुळे शासनाने सदर रिक्त पदे भरणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२६-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
माहे जूलै २०२२ मध्ये सोलापूर जिल्ह्यात अंगणवाडी सेविका-१९९, मिनी अंगणवाडी सेविका-५७ आणि अंगणवाडी मदतनीस-४३१ अशी एकूण ६८७ पदे रिक्त होती.
(३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दि.९.१.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

---

## नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कामांच्या निविदा प्रक्रियेची चौकशी करणेबाबत

**(४४) ५४५४० (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जल जीवन मिशन अंतर्गत सन २०१९ ते सन २०२४ या कालावधीकरिता नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक गावातील घरात पुरेशा दाबासह नियमित पाणी पुरवठा करण्यासाठी सुमारे १२३४ कामे मंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामांपैकी फक्त ६४ कामे पूर्ण असून उर्वरित कामांसाठी ठेकेदारांमध्ये एकी होऊन निविदा प्रक्रियेतील स्पर्धाच संपुष्टात आणल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची ई-निविदेमार्फत कार्यवाही करण्यात आलेली असून, पात्र निविदाधारकांना कामे देण्यात आली आहेत. तसेच ई-निविदेमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या पात्र सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सुध्दा जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची कामे देण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवेगाव (ता.खेड,जि.पुणे) येथील महिलेचा सर्पदंशाने झालेला मृत्यू

**(४५) ५५६४२ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवेगाव (ता.खेड,जि.पुणे) येथील पश्चिम आदिवासी भागातील शेतात गवत कापण्यासाठी गेलेल्या सखुबाई ज्ञानेश्वर वनघरे यांचा सर्पदंश झाल्याने मृत्यू झाला असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आलेआहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, डेहणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने त्यांना खाजगी वाहनाने घोडेगाव येथे उपचारासाठी नेत असतानाच रस्त्यात त्यांचा मृत्यू झाला असून आदिवासींसाठी केंद्र व राज्य शासनातर्फे कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत असतानाही शासनाची आरोग्य सेवा प्रत्यक्षात आदिवासींपर्यंत पोहोचत नसल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
भिवेगाव ता.खेड जिल्हा पुणे येथे सखुबाई ज्ञानेश्वर वनघरे यांचा मृत्यु दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी झाला आहे.
(२) हे खरे नाही, तथापि प्राथमिक आरोग्य केंद्र, डेहणे तालुका खेड जिल्हा पुणे येथे रुग्णवाहिका उपलब्ध असुन सदर रुग्णवाहिका दि.२० सप्टेंबर, २०२१ रोजी विषप्राशन केलेल्या श्री. अक्षय ज्ञानेश्वर कशाळे, वय २३ वर्ष प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झालेल्या रुग्णांस प्राथमिक उपचार करुन दुपारी १२.५० मिनिटांनी संदर्भ सेवा देण्यासाठी रुग्णावाहिका ग्रामीण रुग्णालय, घोडेगाव येथे गेली होती. त्याचदिवशी साधारण दुपारी १.०० वाजेच्या सुमारास सखुबाई ज्ञानेश्वर नवघरे यांना गंभीर अवस्थेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल करण्यात आले. त्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन्ही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी कै. सखुबाई ज्ञानेश्वर नवघरे यांना सीपीआर, ऑक्सीजन, आयव्हीफ्ल्युड मधुन इंजेक्शन एएसव्ही सहा व्हायल इ. उपचार करुन पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यासाठी १०८ रुग्णवाहिकेला संपर्क करण्यात येत होता. तथापि रुग्णांची गंभीर अवस्था पाहून रुग्णांच्या नातेवाईकांनी १०८ रुग्णवाहिकेची वाट न पाहता स्वमर्जीने खाजगी वाहनाने रुग्णांस ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथे घेऊन जाण्याचा निर्णय घेतला
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारणे तसेच जिल्हयातील नागरीकांचे लसीकरणास करण्याबाबत**

**(४६) ५६६५६ (०२-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तथा मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी मतदार संघात घोषणा देखील केली होती,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालय उभारणीकरीता आवश्यक असलेली जमिन सावंतवाडी शहरातील पोलीस वसाहतीनजीक असलेले पोलीस मुख्यालय सद्यःस्थितीत सिंधुदुर्ग नगरी येथे स्थलांतरीत करण्यात आल्याने येथील १३ एकर जमीनीपैकी ३ एकर जमिन सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा सार्वजनिक आरोग्य विभागाने मल्टिस्पेशालिटी रुग्णालयासाठी हस्तांतरण करावी अशी मागणी विठ्ठल-रखुमाई शेतकरी संघटनेने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात कोरोनाचा प्रादूर्भात संपूर्णतः नष्ट झालेला नसतांना सिधुदुर्ग जिल्हयात लसीकरणास पात्र असलेल्या १३,८७९ नागरिकांनी अदयाप कोरोनाची एकही लस घेतली नसल्याचे माहे जाने,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हयातील नागरिकांनी एकही लस न घेण्यामागची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सावंतवाडी येथे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय कधीपर्यत होणे अपेक्षित आहे तसेच, नागरीकांचे लसीकरण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०५-२०२३) :**(१) होय.
(२) सदरचे निवेदन मा.मुख्यमंत्री कार्यालयातून महसूल विभागास पाठविण्यात आले आहे. हे खरे आहे.

(३) होय. सिधुदुर्ग जिल्ह्यातील ६,५१,९६८ पात्र लाभार्थ्यांपैकी १३,८७९ नागरिकांनी कोविड प्रतिबंधात्मक लसीचा एकही डोस घेतलेला नाही.

(४) वैयक्तिक कारणास्तव नकार अथवा दुर्धर आजाराच्या कारणांमुळे या नागरिकांनी कोविड प्रतिबंधात्मक लसीचा डोस घेतलेला नाही.

(५) सावंतवाडी (जि.सिधुदुर्ग) येथे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याकरीता जागा उपलब्ध होणेबाबत जिल्हाधिकारी, सिधुदुर्ग यांना कळविले आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण सत्र आयोजित करुन ९७.८७ टक्के नागरिकांचे पहिल्या डोसचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. तसेच हरघर दस्तक मोहिम- १ व २ अंतर्गत लसीकरणाच्या सर्व साहित्यसह घरोघरी भेट देवून उर्वरित नागरिकांचे लसीकरण पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच दैनंदिन गृहभेटीमध्ये देखील कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे महत्व सांगून शिल्लक लाभार्थ्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जंबो कोविड सेंटर, सातारा येथे झालेला गैरव्यवहार

**(४७) ६२१२६ (०२-०५-२०२३). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जंबो कोविड सेंटर, सातारा यास महाराष्ट्र शासन व भारत सरकार, जिल्हा नियोजन समिती , सामाजिक ट्रस्ट व उद्योगपती, इतर सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यात निश्चित करण्यात आलेल्या दरात मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या एजन्सीला काम देण्यात आले होते त्यांचेकडून ऑक्सिजन बेड, साधारण बेडला आकारण्यात आलेल्या दरामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर तफावत असून ऑक्सिजन सिलेंडरची किंमत, कर्मचा-याचे वेतन संस्था का ही एजन्सी देते या विषयावरून तत्कालीन जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्या एजन्सी बरोबर संगनमाताने कंत्राट देण्यात आले असणे असे निदर्शनात आले आहे. हे खरे आहे काय,

(४) तसेच, इतर साहित्य कुठून खरेदी केले व कसे खरेदी केले तसेच अनेक औषधे ज्यादा रक्कमेने खरेदी केली असल्याचे देखिल निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०५-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडधा (ता.आरमोरी,जि.गडचिरोली) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४८) ६२३१८ (०२-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडधा (ता.आरमोरी,जि.गडचिरोली) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी नियमित हजर राहत नसल्यामुळे रुग्णांवर उपचार होत नाही, औषधे मिळत नाही अश्या अनेक अडचणीमुळे रुग्णांची गैरसाय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन बेजाबदार कर्मचा-यांवर कारवाई करुन या आरोग्य केंद्रात औषधांचा पुरवठा इतर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०६-२०२३) :**(१)हे खरे नाही.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र वडधा येथील कर्मचारी व अधिकारी नियमित हजर राहून आरोग्य सेवा देत आहेत. सदर आरोग्य केंद्रात आवश्यक तो औषध साठा उपलब्ध आहे. कर्मचारी हजर राहत नसल्याबाबत व औषधीचा पुरवठा होत नसल्याबाबत तक्रार जिल्हा स्तरावर प्राप्त नाही.
(३)प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील विटा उपजिल्हा रुग्णालय व खानापूर, आटपाडी, तासगाव येथे आरोग्य उपकेंद्र उभारणी बाबत**

**(४९) ६३०५४ (०२-०५-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विटा (ता.खानापूर,जि.सांगली) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारणे ही बाब निकषाप्रमाणे तपासून कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, खानापूर, आटपाडी, तासगाव (जि.सांगली) तालुक्यामध्ये आरोग्य उपकेंद्र होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने सातत्याने मागणी करीत असून येथे आरोग्य उपकेंद्र होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, रुग्णाची होणारी गैरसोय लक्षात घेता विटा उपजिल्हा रुग्णालय व खानापूर, आटपाडी, तासगाव येथे आरोग्य उपकेंद्र उभारणी बाबत शासनाने कोणती
कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०५-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोडबृहत आराखडयामध्ये सांगली जिल्ह्यामध्ये ०८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६६ उपकेंद्रे स्थापनेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. यामध्ये खानापूर, आटपाडी, तासगाव, जि.सांगली या तीन तालुक्यामध्ये एकूण १९ उपकेंद्रे प्रस्तावित करण्यात आले आहेत.
दरम्यान शासनाच्या दि.१९.०७.२०२१ च्या पत्रान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्याचा बृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करताना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला होता त्या सर्व बाबीचा अवलंब करुन सन २०११ च्या लोकसंख्येनुसार राज्याचा बृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यानुसार सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित राज्याचा जोडबृहत आराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणूक करण्यात आली असून राज्यातील आरोग्य संस्थांचे मॅपिगचे जवळपास काम पूर्ण झाले असून प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यानुसार लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार नवीन संस्थांचे स्थान निश्चित करण्यात येवून बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यात कोरोना काळात सीएसआर फंडाअंतर्गत झालेल्या गैरव्यवहार

**(५०) ६३२८८ (०२-०५-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात सन २०२० मध्ये कोवीड-१९ या जागतिक महामारीच्या काळात सीएसआर फंडातून तत्कालीन जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी व्हेंटिलेटर, पलंग, गाद्या, चादरी ,उशा,इंजेक्शन्स, औषधी, ऑक्सिजन सिलेंडर, पीपीई किट, सिटीस्कॅन मशीन, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नूतनीकरण, कोविड हॉस्पिटल रूपांतरण, डॉक्टरांचे निवासस्थान नूतनीकरण, यासह इतर त्याकाळात झालेली कामे कुठलीही निविदा न मागविता नियमबाह्यरीत्या खरेदी करण्यात आली, हे खरे काय,

(२) असल्यास, नियमानुसार सीएसआर फंडाचा निधी धनादेश, डिमान्ड ड्राफ्ट,आरटीजीएस द्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त होणे क्रमप्राप्त असताना तसे न होता जिल्हा प्रशासनाच्या परस्पर बेकायदेशिररित्या साहित्य खरेदी केली तसेच उद्योजकाकडून गोळा करण्यात आलेल्या निधीची कुठेही नोंद न होता बेकायदेशिर कोटयावधी रुपयाचे साहित्य खरेदी करून कोवीड हॉस्पीटलमध्ये आणून ठेवले असून सदर साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याने आजही सदर साहित्य विनावापर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीएसआर फंडातून प्राप्त साहित्याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना विचारणा केली असता ते याबाबत ते अनभिज्ञ असल्याचे सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निकृष्ट दर्जाचे सॅनिटायझर जिल्ह्यातील तत्कालीन मंत्री यांच्या कारखान्यातून नियमबाह्य खरेदी करून अपहार करण्यात आला.हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बाजारभावापेक्षा अधिकच्या दराने व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यात आले याबाबत लोकप्रतिनिधी यांनी व्यक्तिशः निवेदना सह अनेकवेळा पत्रव्यवहार करून सदरील गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०५-२०२३) :** (१) ते (४) हे खरे नाही.

कोवीड-१९ या जागतिक महामारीच्या काळात जालना जिल्ह्यामध्ये रुग्णसेवा देण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक , जालना यांचेमार्फत सीएसआर फंडातून कोणत्याही प्रकारच्या औषधी व साहित्य-सामुग्री यांची खरेदी करण्यात आलेली नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नूतनीकरण, कोविड हॉस्पिटल रूपांतरण, डॉक्टरांचे निवासस्थान नूतनीकरण इ. दुरुस्ती व नुतनीकरण कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेली आहेत. सॅनिटायझर खरेदी स्थानिक स्तरावर शासनाच्या विहीत खरेदी पध्दतीने न्युनतम दराने करण्यात आलेली आहे.

(५) कोवीड-१९ या जागतिक महामारीच्या काळात जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयामार्फत व्हेंटीलेटर खरेदी करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.